प्रेसनोट दि.११/०५/२०१८

# दोन अल्पवयीन मुलींची सुटका ...
# सामाजिक सुरक्षा विभागाची कारवाई
# महिला आरोपीस अटक

दि.१०/०५/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, यांना पोहवा राजेश उंबरे यांचे कडुन माहीती मिळाली की, प्रिया जाधव ही महिला तेलंगणा राज्यातील मुलींना ज्ञानेश हौसींग सोसायटी जवळ,तिसरा मजला, धावडे बिल्डींग, वारजे माळवाडी एन डी ए रोड पुणे येथे ठेवुन त्यांना वेश्या गमनासाठी आलेल्या गि-हाईकां सोबत शरीर सबंध ठेवण्यास लावुन नमुद मुलींचेकडुन वेश्या व्यवसाय करुन घेत आहे अशी बातमी मिळाली.

या अनुषंगाने सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचे पथक तसेच वारजे माळवाडी पोलीस स्टेशन कडील स्टाफ असे संयुक्त पथकाने मिळालेल्या बातमीची खात्री करुन ज्ञानेश हौसींग सोसायटी जवळ,तिसरा मजला, धावडे बिल्डींग, वारजे माळवाडी एन डी ए रोड पुणे येथे छापा मारुन वेश्याव्यवसायासाठी ठेवण्यात आलेल्या तेलंगणा राज्यातील दोन अल्पवयीन मुली व यांना वेश्याव्यवसायास लावणारी महिला नामे प्रिया जाधव वय २१ वर्षे रा.ज्ञानेश हौसींग सोसायटी जवळ, तिसरा मजला, धावडे बिल्डींग, वारजे माळवाडी एन डी ए रोड पुणे मुळ रा. तेलंगणा राज्य, हिस ताब्यात घेवुन अल्पवयीन मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन प्रिया किसन जाधव हिचे विरुध्द वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे गुरनं. १५७/२०१८ इटपा ॲक्ट १९५६ चे क. ३,४,५,६ सह भादंवि कलम ३७०, ३७० अ, सह पोक्सो ॲक्ट ५,६,११,१७ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास वारजे माळवाडी पोलीस स्टेशनकडे सुपुर्त केला आहे.

कारवाईचेवेळी बनावट गि-हाईकाकडे कारवाईसाठी पाठविण्यात आलेले रोख रुपये २५००/- व प्रिया जाधव हिच्याकडे वेश्याव्यवसायाच्या कमाईतुन मिळालेले रुपये १०००/- असे सर्व मिळुन रुपये ३५००/- , एक मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, सपोनि शीतल भालेकर, राजेश उंबरे, राजाराम घोगरे, रमेश लोहकरे, नितिन तरटे, ननिता येळे, कविता नलावडे, नितिन तेलंगे, रेवनसिध्द नरोटे, सुनिल नाईक, सचिन कदम, राजेंद्र कचरे, अनुराधा ठोंबरे, सचिन शिंदे यांनी व वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री,बाजीराव मोळे, व त्यांचेकडील स्टाफ यांनी केलेली आहे.